# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ४८२ /२०२३-२४ दिनांक : ०८/०८/२०२३

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १ | कदंबा | २० ते ३० फुट | ०१ | ०८ वर्ष | सदरचे झाड प्लॉट नं १२ सर्वे नं ५१४, ड्रीम ब्लॉसम बिल्डींग समोर, नया नगर मिरारोड (पु.) येथिल आहे.झाडाची मुळे मनपाच्या गटारात गेली असून गटार तुटलेल्या अवस्थेत आहे, तसेच गटार वारंवार तुंबुन गटारातील पाणी रस्त्यावर येते. झाड मनपा रोडवरील असून झाडामुळे अर्जदाराच्या घराचे पत्रे तुटलेले आहे. घराचे पत्रे फुटण्याचा प्रकार वारंवार होत आहे.सदर झाड पडून जिवित व वित्तनाही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे धोकादायक झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **रशिदा बी मोहमद अहमद यांचे दि.३१/०७/२०२३ रोजीचे पत्र.** |
| | | एकूण | ०१ | | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणिजन)
**सहाय्यक आयुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

2023-2024 Sadar -Permission